नि.फौ.प्र.क्र.२६२/२०१४
सरकार / दत्तात्रय
निशाणी - १५

**कलम २९९ फौ.प्र.सं. अन्वये आरोपीच्या गैरहजेरीमध्ये साक्षदाराचा बयान**

**सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की–
माझे नाव: विश्वास बुवासो सावंत
वयः ४४ वर्षे, व्यवसायः शेती,
निवासस्थान: राजाळे, ता. फलटण, जि. सातारा.

**सरतपासणी सहायक सरकारी वकील कु. एस. एस. मुळीक यांच्यामार्फत दुपारी ०१.३१ वाजता सुरू**

दिनांक १३/०६/२०१४ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकामी बोलविले नव्हते. मी फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन येथे माझ्या कामानिमीत्त गेलो होतो. त्यावेळी पोलीसांनी माझी सही घेतली होती. माझ्यासमक्ष पोलीसांनी कुठलीही कार्यवाही केली नव्हती. माझ्या समक्ष कुठलाही पंचनामा करण्यात आला नव्हता. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. म्हणून पंचनाम्यास सहीपुरता **नि.क्र.१६** देण्यात आले.

**(साक्षीदार हा सरकारपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहायक सरकारी वकिलांनी उलटतपासनीच्या अनुशंघाने प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३/०६/२०१४ रोजी पोलीसांनी मला विडणी मायनर फाट्यावर पंचनाम्याकामी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ आम्हाला फिर्यादी निलेश नवनीतराय मेहता यांना दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सोबत दुसरे पंच जगदीश विठ्ठल शेडगे हे सुध्दा होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष सविस्तर घटनास्थळ पंचनामा तयार करून माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण
दिनांक – ०५/१२/२०२४

(आर.डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, फलटण